ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - IV OCTOBER - DECEMBER - 2020

MARATHI PART - II / III

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरणे व सद्य:स्थिती<br>**प्रा. डॉ. विनायक खिल्लारे** | ६६-६८ |
| १५ | राजश्री शाहू महाराजांचे पाटबंधारे व कृषीविषयक विचार<br>**शिनगारे भास्कर** | ६९-७० |
| १६ | राजर्षी शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरण विषयी धोरणे आणि सद्यस्थिती<br>**प्रेमकुमार कौशल्य** | ७१-७३ |
| १७ | राजर्षी शाहू महाराजांचे कल्याणकारी धोरण आणि सद्य:स्थिती<br>**डॉ. रमेश वाघमारे** | ७४-७६ |
| १८ | अस्पृश्यांचे उद्धारकर्ते : राजर्षी शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.** | ७७-८० |
| १९ | रा.रं. बोराडे यांच्या ग्रामीण कादंबरीचे आकलन<br>**सतीश अप्पाराव तुपे** | ८१-८४ |
| २० | पर्यावरणविषयक समस्या, पर्यावरणाचे व्यवस्थापन व उपाययोजना<br>**डॉ. मिलिंद एन. खरात** | ८५-८७ |
| २१ | जालना जिल्ह्यातील औद्योगिक कामगार एक अध्ययन<br>**गिरी श्याम नारायण**<br>**डॉ. के. एन. शेवाळे** | ८८-९२ |
| २२ | शिक्षक - प्रशिक्षकांचे ताण-तणाव व्यवस्थापण एक अभ्यास<br>**डॉ. मनोरखाँ रशिदखाँ पठाण** | ९३-९७ |
| २३ | हरिभाऊ बागडे यांचे सहकार क्षेत्रातील योगदान : एक अवलोकन<br>**अमोल दिनकर गावंडे** | ९८-१०३ |
| २४ | जय प्रकाश नारायण आणि लोकशाही विचार<br>**प्रा. विजयकुमार रामदास परसोडे** | १०४-१०५ |
| २५ | लिंगभाव आणि इतिहास लेखन<br>**अजय एकनाथ अहिर** | १०६-१०९ |

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २५. लिंगभाव आणि इतिहास लेखन

**अजय एकनाथ अहिर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, म.स.गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव.

१९व्या शतकात सुरु झालेली भारतीय इतिहास लेखनाची परंपरा हि मुख्यतः राजकीय आणि सामाजिक इतिहासाला मध्यवर्ती मानून करण्यात आली. साम्राज्यवादी धोरणाला नैतिक अधिष्टान देण्यासाठी वसाहतवादी इतिहासकारांनी भारताचा इतिहास हा वसाहतीक दृष्टीकोनातून लिहिला. या इतिहासकारांनी स्त्रियांना सामाजिक इतिहासात समाविष्ट करून ब्रिटीश स्त्रियांच्या तुलनेत त्या कशा मागासलेल्या आहेत हे दाखवण्यावर भर दिला. सांस्कृतिक अभिनिवेशातून इतिहासलेखन करण्याची युरोप केन्द्री प्रवृत्ती हि या प्रकारच्या इतिहासाचा मूलाधार होती.

वासाहतिक इतिहासाच्या विरोधात राष्ट्रवादी इतिहासकारांनी सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात इतिहासाची मांडणी केली या मध्ये त्यांनी वैदिक संस्कृतीला केंद्रीभूत मानून भारताचा सांस्कृतिक इतिहास लिहिला. या इतिहासात आर्य स्त्रीची प्रतिमा भारतीय स्त्री म्हणून मांडण्यात आली. (रेगे १९९८: ९६) याच काळात इतिहासात संस्कृती आणि धर्म यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. आळतेकरांनी आपल्या पुस्तकात 'Position of women in Hindu civilization' हाच दृष्टीकोन मांडला आहे .

स्वातंत्र्योतर काळातही इतिहास लेखनामध्ये राष्ट्रवादी प्रवाह हा संस्कृती सापेक्षच राहिला. या काळात डाव्या विचारवंतानी इतिहासाची भौतिकवादी अन्वेषण पद्धतीने मांडणी केली परंतु डाव्या इतिहासकारांच्या लेखनात राजकीय आणि आर्थिक घटक कैंद्रस्थानी राहिले सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांकडे दुर्लक्ष झाले. १९७० नंतर मात्र भारतात स्त्रीमुक्ती चळवळ आणि दलित चळवळ यांनी अशा प्रकारच्या पूर्वग्रहदुषित इतिहासाच्या मांडणीला विरोध करून नवे पद्धतीशास्त्र विकसित केले आणि इतिहास लेखनशास्त्राच्या प्रवाहात नवीन प्रवाहांचा उद्य झाला. या नव्या प्रवाहांतील स्त्रीवादी दृष्टीकोनाने स्त्रियांना इतिहास दिला. इतिहासाचा विषय म्हणून स्त्रियांना मोठ्याप्रमाणात दृश्यमान करण्यात आले. इतिहासातील स्त्रीवादी परिप्रेक्ष्य हा फक्त नवीन ऐतिहासिक विषय निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवत नाही तर इतिहास या ज्ञानशाखेच्या तथाकथित लिंगभाव निरपेक्ष पद्धतीशास्त्राचीही चिकित्सा करतो. जोपर्यंत मुख्यप्रवाही इतिहास हे स्वीकारत नाही कि 'समाजाची प्रत्येक बाजू हि लिंगभावाने घडलेली आहे' तो पर्यंत स्त्रियांना दृश्यमान करणारे आणि त्यांना कृतीशील कर्तेपणा देणारे योगदानाचे इतिहास इतिहासकारांच्या क्षितिजावर सामावून घेतले जावू शकतात. (नायर २००९ :१)

१९७५ नंतरच्या नवीन सामाजिक चळवळीनी ज्ञानक्षेत्राची खोलवर चिकित्सा केली. स्त्रीदास्यची उकल करताना स्त्रीवादी चळवळीना देखील स्त्रियांचा इतिहास पडताळून पाहण्याची गरज भासली आणि

त्यांनी इतिहासासारख्या ज्ञानशाखेची स्त्रीवादी दृष्टीकोनातून पुनर्मांडणी करण्याचे काम हाती घेतले. सुरुवातीच्या स्त्रीवादी इतिहास लेखनात स्त्रियांच्या शौर्याचे, कर्तत्वाचे गोडवे गायले गेले.या इतिहास लेखनात सुद्धा सर्वसामान्य स्त्रियांचा विचार झाला नाही. कुलीन, राजघराण्यातील स्त्रियांचे जीवन मांडले गेले. या नंतर च्या लेखकांनी स्त्रिया या सदासर्वकाळ शोषित आणि अत्याचारी होत्या हे सिद्ध करण्यासाठी इतिहासाचा आधार घेतला.पुढील काळात स्त्रियांची विविध क्षेत्रातील कामगिरी हि नव्याने लिहिण्याचे प्रयत्न झाले. नंतरच्या टप्प्यात लिंगभाव जडण घडणीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला. लिंगभावाची जडणघडण हि वंश, वर्ग, जात, राष्ट्र, लैंगिकता या घटकानुसार बदलत असते या बाबतचे भान या काळात निर्माण झाले. (रेगे १९९८:९७) सामाजिक परिवर्तनाच्या राजकारणाचा एक भाग म्हणून स्त्रीवादी इतिहासलेखानाचा प्रवाह पुढे आला. आतापर्यंत इतिहास लेखनात अदृश्य असलेल्या स्त्रियांना दृश्य करणारा ,स्त्रियांचे समाजातील योगदान ठळक करणारा इतिहास आता लिहिला जाऊ लागला. इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर स्त्रियांचे शोषण कसे झाले याबाबतच्या इतिहास लेखनाला चालना मिळाली.

आधुनिक भारतासंबंधीच्या इतिहासलेखन शास्त्रामध्ये राष्ट्रवादा संबंधीच्या इतिहास लेखनाला महत्व प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासलेखनात बऱ्याच काळापर्यंत अभिजनवादाचा प्रभाव राहिला आहे. राष्ट्रवादी इतिहासकरांनी स्त्रियांचा अभ्यास मुली,पत्नी,माता,विधवा या कोटीक्रमातून केला. प्राचीन काळात स्त्रियांसंबंधी अनेक कायदे, नियम करण्यात आले होते या संबंधात राष्ट्रवादी इतिहासकार काहीच भूमिका घेत नाहीत ते मौन बाळगतात.प्राचीन काळात दासीप्रथा होती या दासी आणि कनिष्ट जातीतील स्त्रियांच्या बाबतीत राष्ट्रवादी इतिहासकार काहीच मत मांडत नाहीत. वसाहतवादी अभिजनवाद आणि बुर्ज्वा राष्ट्रवादी अभिजनवाद या दोन्हीचा उगम जरी भारतातील ब्रिटीश राजवटीत झाला असला तरी सत्तांतरानंतर दोन्ही कायम राहिले. आणि ब्रिटन मध्ये नववसाहतवादी व्यवहारात आणि भारतात नवराष्ट्रवादी व्यवहारात समाविष्ट झाले. (जावरे २०११ :११०) ब्रिटीश प्रशासकांनी भारतीय समाज, चालीरीती, परंपरा, धर्म, संस्कृती जाणून घेण्यासाठी भारताचा इतिहास लिहिण्याचे प्रकल्प हाती घेतले या इतिहास लिखाणामागे त्यांचा उद्देश आपल्या सत्तेला अधिमान्यता मिळवून घेणे हा होता. जेम्स मिल, विल्यम जोन्स यांनी भारतीय स्त्रियांची दुर्दशा मांडली. वसाहत काळातील स्त्रीप्रश्नाचा इतिहास म्हणजेच ब्राह्मणी समाजसुधारक चळवळीचा व स्त्रीदास्याच्या राष्ट्रवादी चळवळीतील सहभागाचा इतिहास असे मानले गेले. ब्राह्मण ग्रंथाच्या आधारे स्त्रीदास्याचे विश्लेषण करण्यात आले. हिंदू समाज व्यवस्थेत वैदिक काळी व प्राचीन काळी स्त्रीला उच्च स्थान होते मात्र मुस्लिम आक्रमणानंतर स्त्री रक्षणासाठी तिच्यावर बंधने लादण्यात आली अशी सोयीची मांडणी सुरुवातीच्या काळात करण्यात आली. स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या या पहिल्या टप्प्यात रजिया सुलतान,झाशीची राणी, ताराबाई शिंदे,पंडिता रमाबाई,यांच्या कार्याची वर्णने लिहिली गेली. हि वर्णने स्त्रियांना इतिहासात समाविष्ट करण्यासाठी महत्वाची ठरली.(रेगे १९९८: ९८) या टप्प्यात ज्या स्त्रीया राजसत्तेशी संबंधित होत्या, ज्या रणांगणावर लढल्या त्यांचा विचार करण्यात आला. या प्रकारच्या परिप्रेक्ष्यातून पुरुषसत्ताक पद्धतीच अधोरेखित झाली. अशा प्रकारच्या चरीत्र लेखानामध्ये स्त्रीवादी

चर्चाविश्वाचा अभाव जाणवतो. या नंतर अनेक स्त्रीवादी विचारवंतानी इतिहास या ज्ञानशाखेची स्त्रीवादी दृष्टीकोनातून पुनर्मांडणी करण्याचे काम हाती घेतले आणि स्त्रीवादी इतिहास हि ज्ञानशाखा निर्माण झाली. इतिहास लेखन शास्त्रातील सर्वात प्रभावी ज्ञानशाखा म्हणून स्त्रीवादी इतिहासाचा उल्लेख करता येईल.

स्त्रीवादी इतिहासाच्या दुसऱ्या टप्प्यात स्त्रियांच्या योगदानाचा इतिहास लिहिला गेला. म्हणूनच या प्रकारच्या इतिहासाला Contributory History असे म्हंटले गेले. यामध्ये स्वातंत्र्य चळवळीत, समाज सुधारणा चळवळीत, राजकीय चळवळीत स्त्रियांनी जो सहभाग घेतला त्याची चर्चा करण्यात आली. १९७५ ते १९८५ या दशकातील नव्या सामाजिक चळवळीबाबत अनेक इतिहास लिहिले गेले. हे इतिहास स्वायत स्त्रीसंगठना कडून लिहिले गेले स्त्रियांचा अनुभव हा या लिखाणाचा आधार ठरला. याच काळात गेल ओमवेट यांनी जात,वर्ग,लिंगभाव या परिप्रेक्षात स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास केला. इ स १९७५ नंतर स्त्रियांच्या शोषणा संबंधीच्या इतिहासाला चालना मिळाली. पाश्चिमात्य जहाल स्त्रीवादाने ' जे जे खाजगी ते ते राजकीय' अशी भूमिका घेतली. या जहाल स्त्रीवादाने सर्व प्रकारच्या ज्ञानाची स्त्रीवादी चिकित्सा सुरु केली. स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाचा अन्वयार्थ मांडला तर भूतकाळाचे अतिशय वेगळे आकलन होईल असा विचार स्त्रीवादी विचारवंतानी मांडला ज्ञान हे वस्तुनिष्ठ असते हे प्रमेय स्त्रीवादी विचारवंतानी नाकारले. संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार वास्तवाचे आकलन बदलते असे त्यांनी सिद्ध केले. यालाच भूमिदृष्टी सिद्धांत असे म्हंटले गेले. स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव केंद्रस्थानी असले पाहिजेत.

इतिहासाची स्त्रीवादी दृष्टीकोनातून मांडणी करणारे संशोधन जगभरात अनेक देशात सुरु आहे. मात्र स्त्रीवादी ऐतिहासिक संशोधनाच्या बाबतीत ब्रिटन.अमेरिका,ऑस्ट्रेलिया, व भारत या चार देशांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. स्त्रीवादी, लिंगभाव संशोधनाने भारतीय इतिहासलेखनावर आपला खोल ठसा उमटवला, भारतीय इतिहासाविषयी एक नवी दृष्टी दिली आणि इतर नव्या अभ्यासाना चालना दिली. इ स १०८० ते १९९० या काळात स्त्रियांच्या निरनिराळ्या चळवळी मधील सहभागाबद्दलचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहास लेखन झाले. यामध्ये आंबेडकरी चळवळी मध्ये काम करणाऱ्या स्त्रियाची मौखिक इतिहासाच्या आधारे अभ्यास करण्यात आला. निरनिराळ्या काळात स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याचे संकलन याच काळात करण्यात आले. स्त्रीवादी लिखाण म्हणजे दैनदिन जीवनात स्त्रियांनी इतिहास व राजकारणाला दिलेला प्रतिसाद होय. या स्त्रिया पुरुष प्रधान व्यवस्थेच्या चौकटीतून लिहित असल्याने लिंगभावाच्या विचारप्रणालीचा त्यांच्यावरही प्रभाव असतोच. तसेच या लिंगभावाच्या जडणघडणीला स्त्रियांनी केलेला विरोध हा जातीवर्गानुसार भिन्न असतो याची जाणीव या इतिहासलेखनात जाणवते .सबा

प्राचीन भारतीय इतिहासाचा अभ्यास स्त्रीवादी दृष्टीकोनातून करण्यात आला. या अभ्यासाच्या आधारे भारतात मातृसताक पद्धती होती हे सिद्ध करण्यात आले. कॉ.शरद पाटील, डी डी कोसंबी, डॉ. इरावती कर्वे यांनी मातृसताक पद्धती विषयी संशोधन केले आणि शेतीचा शोध स्त्रियांनी लावला असे संशोधन पुढे आणले. मिथकांचा अभ्यास करून मातृपूजक समाज व्यवस्थे विषयीचे संशोधन पुढे आले. भारतातील मातृसताक व्यवस्था आणि नव्याने आलेली पितृसताक व्यवस्था यांच्यात संघर्ष होऊन शेती

आणि पशुपालन यावर पुरुषांनी आपले प्रभुत्व स्थापित केले आणि पितृसताक पद्धती सुरु झाली आणि स्त्रियांच्या दुय्यमत्वाला सुरुवात झाली असे संशोधनातून मांडण्यात आले. डॉ. उमा चक्रवर्ती यांनी ब्राह्मणी पितृसतेच्या परिप्रेक्ष्यात प्राचीन भारतीय स्त्रीवादी इतिहासाची मांडणी केली. त्यांच्या मते शेतीच्या उत्पादनासाठी सतत मजूर वर्ग मिळत राहावा म्हणून बहुसंख्य पुरुषांना नियंत्रित करणारी उत्पादन व्यवस्था जातीव्यवस्था जन्माला आली, मुलांना जन्म देऊन सतत मजूर पुरवठा करणाऱ्या, कुटुंबाच्या खाजगी मालमतेला औरस वारस देणाऱ्या स्त्रियांवर आणि जातींचे शुद्धत्व राखण्यासाठी त्यांची लैंगिकता व जननक्षमता यांवर नियंत्रण आणणारी ब्राह्मणी पितृसता अस्तित्वात आली. जाती व्यवस्था आणि ब्राह्मणी पितृसता या परस्पर पूरक व्यवस्था होत्या अशी मांडणी उमा चक्रवर्ती करतात. स्त्रियांच्या इतिहासाची उकल हि प्रथा,परंपरा,रुढी, दर्जा यांच्या अभ्यासातून होत असते प्रथा आणि परंपरा यांचा उत्पादन व्यवस्थेशी असणारा संबंध, पितृसत्ता आणि लिंग भावनिर्मितीची प्रक्रिया यांच्यातील आंतरसंबंध तपासण्याची दृष्टी उमा चक्रवर्ती यांच्या अभ्यासातून मिळते.स्त्रीवादी इतिहास लेखनामध्ये १९९० च्या दशकात विश्लेषणाच्या पातळीवर बदल झाले या काळात मुख्यत लिंगभाव हि संकल्पना स्त्रीवादी इतिहासाच्या केंद्रस्थानी आली. स्त्रीवादी विचारवंतानी स्त्रियां मधील जात,वर्ण,वर्ग राष्ट्र या वरून पडणाऱ्या भेदांवर लक्ष केंद्रित केले.स्त्रीवादी इतिहासलेखन शास्त्राची सैद्धांतिक मांडणी या काळात करण्यात आली. वंचितांच्या इतिहास लेखनामध्ये (subaltern) सुरुवातीच्या पाच खंडापर्यंत स्त्रियांचा विचार केलेला दिसत नाही सहाव्या खंडात मात्र गायत्री स्पिवाक यांनी स्त्रीवादी इतिहासाची मांडणी केली. एकूणच स्त्रीवादी इतिहासाच्या अभ्यासात ज्या नवीन संकल्पना आणि सैद्धांतिक मांडणी वेळोवेळी करण्यात आली त्याचा थोडक्यात आढावा प्रस्तुत निबंधात करण्यात आला आहे.

संदर्भ

1. भागवत विद्युत आणि परदेशी प्रतिमा (संपा) अब्राह्मीस्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने, स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, पुणे १९९८
2. मोघे किरण,दलित स्त्रियांची वेगळी चूल,महाराष्ट्र टाइम्स,१९९६
3. परदेशी प्रतिमा,डॉ आंबेडकर आणि स्त्रीमुक्तीवाद,क्रांतिसिंह नानापाटील अकादमी ,पुणे,१९९७
4. पावडे कुमुद,पितृप्रधानता आणि दलित स्त्रियांचा संघर्ष, आलोचना, पुणे १९९६
5. Chakravarti Uma and Roy Kumkum.In search of our Paste.A Review of the Limitations and Possibilities of the Historiography of Women in Early India ,EPW,vol 23,no 18,Apr 30,1998
6. Rege sharmila ,Caste and Gender : The Violance against Women in India in Jigdand(ed)Dalit women Gyan: New Delhi
7. मून आणि पवार, आम्हीही इतिहास घडवला, स्त्री, मुंबई, १९९६